आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

रविवार दिनांक १९ एप्रिल २०२६

ठळक बातम्या

1. **देशभरात अक्षय्य तृतीयेचा उत्साह.**
2. **विविध मागण्यांसाठी कृषी निविष्ठा विक्रेत्यांचा २७ एप्रिलपासून बेमूदत बंदचा इशारा.**
3. **नागपूर जिल्ह्यातील कामठी येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला शहीद हेमंत करकरे यांचं नाव.**

आणि

4. **अकोल्यात आज 45 अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद; उद्या वर्धा जिल्ह्यात उष्णतेची लाट कायम राहण्याचा अंदाज.**

आता सविस्तर बातम्या .....

अक्षय्य तृतीया

महाराष्ट्रासह देशभरात आज अक्षय्य तृतीयेचा सण उत्साहात साजरा होत आहे. साडेतीन मुहुर्तांपैकी एक समजला जाणारा हा सण, कधीही नाश न पावणारं सुख आणि समृद्धीचं प्रतीक मानला जातो. नागपूरसह राज्यातल्या सर्व प्रमुख शहरांच्या बाजारपेठांमध्ये आज नागरिकांचा खरेदीचा उत्साह दिसून येत आहे. आजच्या मुहूर्तावर राज्यात मोठ्या प्रमाणात विवाह सोहळे देखील होतात. हे लक्षात घेऊन, राज्य शासनानं बाल विवाह रोखण्यासाठी कडक उपाययोजना केल्या आहेत. यंदा, सोन्याचे दर विक्रमी पातळीवर असले, तरी सोनं खरेदीचा उत्साह मात्र कायम आहे. आज परशुराम आणि महात्मा बसवेश्वर यांची जयंती देखील साजरी होत आहे. अक्षय्य तृतीया तसंच परशुराम आणि बसवेश्वर जयंतीनिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. श्री परशुराम जन्मोत्सवानिमित्त नागपुरात आज सायंकाळी शोभा यात्रेचं आयोजन करण्यात आलं आहे. या शोभा यात्रेचं उद्घाटन आमदार प्रवीण दटके यांच्या हस्ते होईल. आग्याराम

देवी मंदिरापासून यात्रेला सुरुवात होईल आणि हनुमान नगर इथं शोभायात्रेची समाप्ती होईल. या ठिकाणी महाप्रसादाचं आयोजन करण्यात आलं आहे.

बंदचा इशारा

खरीप हंगामाची पूर्वतयारी सुरू झाली असतानाच कृषी निविष्ठा विक्रेत्यांनी येत्या २७ एप्रिलपासून बेमूदत बंदचा इशारा दिला आहे. शासनाने या विक्रेत्यांच्या प्रलंबित मागण्या अद्यापही पूर्ण न केल्याने राज्यस्तरीय बंदचं आवाहन माफदा अर्थात महाराष्ट्र फर्टीलायझर्स पेस्टीसाइड, सीडस् डीलर्स असोसिएशनन केलं असून त्यास अमरावती जिल्हा कृषी निविष्ठा विक्रेता संघटनेन समर्थन दिलं आहे. कंपन्यांकडून खतांचे लिंकिंग कृषिनिविष्ठा विक्रेत्यांवर करण्यात येत असून कंपन्यांकडून रासायनिक खतांचा पुरवठा होताना होणारे कंपनीस्तरावरील लिंकिंग बंद करणे, एचटीबीटी बियाण्यांची तस्करी रोखणे, साथी पोर्टल ॲप वापराची सक्ती विक्रेत्यावर न करता बियाणे उत्पादक आणि पुरवठादार कंपनी स्तरावर राबविणे, बियाण्यांचे नमूने फेल गेल्यास विक्रेत्यांना आरोपी न करता साक्षीदार करणे, गुणवत्ता तपासणीसाठी घेण्यात येणाऱ्या नमुन्यांची रक्कम वर्षानुवर्षे विक्रेत्यांना मिळालेली नाही, ती परत करणे . या मुख्य मागण्यांसह एकूण १४ प्रकारच्या मागण्या करण्यात आल्या आहेत. वारंवार यासंदर्भातील निवेदने देण्यात आली असली तरी शासन आणि कृषी विभागाकडून ठोस निर्णय होत नसल्यान कृषी निविष्ठा विक्रेत्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. कृषी विभागान या तक्रारींची तातडीने दखल घेऊन आठ दिवसांत त्या सोडवाव्यात, अशी मागणी करण्यात आली असून २७ एप्रिलपासून बेमुदत बंदचा इशारा देण्यात आला आहे.

आयटीआय उदघाटन

नागपूर जिल्ह्यातील कामठी येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला शहीद हेमंत करकरे यांचं नाव देण्यात आलं आहे. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व शासकीय तांत्रिक विद्यालयाच्या नवीन इमारतीचं लोकार्पण आज मान्यवरांच्या हस्ते करण्यात आलं. या कार्यक्रमास महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद आदी मान्यवर उपस्थित होते. या निर्णयामुळे देशासाठी बलिदान देणाऱ्या शूर अधिकाऱ्याच्या स्मृतीला अभिवादन करण्यात येत असून, विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती आणि कर्तव्यनिष्ठेची प्रेरणा जागृत होईल असा विश्वास कौशल्य विकास मंत्री

मंगलप्रभात लोढा यांनी व्यक्त केला. हे विद्यालय ग्रामीण तसेच शहरी भागातील विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार असून त्यांच्यात कौशल्यविकास आणि रोजगाराच्या संधी वाढविण्यास हातभार लावणार आहे, असं प्रतिपादन यावेळी महसूलमंत्री बावनकुळे यांनी केलं.

मुख्यमंत्री

महाराष्ट्रात नाशिक जिल्ह्यातल्या एका आयटी कंपनीतल्या धर्मांतर प्रकरणाचा पोलिसांनी सखोल तपास करावा, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. राज्यातल्या कायदा आणि सुव्यवस्थेच्या परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी काल झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत त्यांनी हे निर्देश दिले. या प्रकरणी दोषी व्यक्तींना कठोर शासन व्हावं, यासाठी तपासामध्ये कोणतीही त्रुटी राहणार नाही, याची खात्री करावी, अशी सूचना त्यांनी यावेळी केली.

अपघात

समृद्धी महामार्गावर बुलढाणा नजीक एका खाजगी लक्झरी बसचा आज, भीषण अपघात झाला. चालक आणि क्लिनर मोबाईलवर रील बनवण्यात व्यस्त असल्यान बसवरील नियंत्रण सुटलं आणि बस थेट पलटी झाली. या अपघातात दीड वर्षाच्या बाळाचा मृत्यू झाला असून अंदाजे २५ प्रवासी जखमी झाले.

“खरीप हंगाम-२०२६

खरीप हंगाम २०२६ शेतकऱ्यांसाठी यशस्वी आणि उत्पादनक्षम ठरावा, तसेच सन २०२६-२७ खरीप हंगामात जास्तीत जास्त क्षेत्रावर पेरणीचे नियोजन करण्यात आले असून त्यादृष्टीने कृषी विभागाने पूर्वतयारी सुरू केली आहे. यंदा एल निनोच्या पार्श्वभूमीवर हवामानाचा अंदाज वर्तवण्यात आला असून त्याचा शेती क्षेत्रावर होणारा संभाव्य परिणाम, पर्जन्यमानाची स्थिती आणि त्यानुसार पीक पद्धती यावर चर्चा करण्यासाठी खरीप हंगाम २०२६ च्या नियोजनासाठी राज्यस्तरीय कार्यशाळेचं आयोजन करण्यात आलं असल्याची माहिती राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. उद्या सोमवार दि.२० एप्रिल रोजी पुण्यात सारथी सभागृहात सकाळी १०.३० वाजता या कार्यशाळेचं आयोजन करण्यात आलं आहे.

अखंडित वीज

अकोला परिमंडळात सुरू असलेल्या फिडर सेपरेशनच्या कामामुळे वीज पुरवठ्याच्या गुणवत्तेत सुधारणा होवून वीज ग्राहकांना अखंडित आणि दर्जेदार वीजपुरवठा मिळणार

असून या कामाला गती देण्याचे निर्देश मुख्य अभियंता राजेश नाईक यांनी दिले आहेत. सध्या या प्रकल्पाचं सुमारे ६५ टक्के काम पूर्ण झालं असून उर्वरित कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. अकोल्यातील विद्युत भवन इथं पार पडलेल्या पायाभूत आराखडा विभागाच्या आढावा बैठकीत त्यांनी फिडरनिहाय कामाचा आढावा घेतला.

सफरचंदाची बाग

बुलढाणा जिल्ह्यातील आदिवासी बहुल संग्रामपूर तालुक्यात सातपुड्याच्या पायथ्याशी प्रयोगशील शेतकरी सुभाष चांदुरकर यांनी कडक उन्हात सफरचंदाची बाग यशस्वीपणे फुलवून एक नवा आदर्श निर्माण केला आहे. त्यांनी प्रामुख्याने उष्ण हवामानात तग धरून राहणाऱ्या हरीमन ९९ या सफरचंदाच्या जातीची निवड केली. ही जात ४० ते ४५ अंश सेल्सिअस तापमानातही चांगले उत्पादन देते.

हवामान

मागील काही दिवसांपासून राज्यात कमाल तापमानात सातत्यानं वाढ होत आहे. विदर्भातील बहुतांश जिल्ह्यात देशातील सर्वोच्च उष्णतामान नोंदवण्यात येत असून आज अकोल्यात 45 अंश सेल्सिअस इतकं कमाल तापमान नोंदवण्यात आलं. अकोला,अमरावती आणि वर्धा या जिल्ह्यांसाठी आज हवामान विभागांनं उष्णतेचा येलो अलर्ट जारी केला असून उद्या देखील वर्धा जिल्ह्यात उष्णतेची लाट कायम राहण्याचा अंदाज आहे. उद्या अमरावती, अकोला, वाशिम, यवतमाळ आणि चंद्रपूर या जिल्ह्यांत विजेच्या कडकडाटासह वादळाची शक्यता वर्तवण्यात आली असून ताशी 30 ते 40 किलोमीटर वेगाने वारे वाहू शकतात. दरम्यान आज नागपुरात 43 पूर्णांक 8 दशांश अंश सेल्सिअस इतकं शुष्क तापमान नोंदवण्यात आलं. येत्या काही तासात अमरावती आणि चंद्रपूर जिल्ह्यात वादळाची शक्यता हवामान विभागातर्फे वर्तविण्यात आलेली आहे.

हवामान/ निर्देश

चंद्रपूर जिल्ह्यात वाढत्या उष्णतामानाच्या पार्श्वभूमीवर सर्व शैक्षणिक संस्था सकाळच्या सत्रात सुरू करून जास्तीत जास्त सकाळी 11 वाजेपर्यंत सोडण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणच्या अध्यक्ष वसुमना पंत यांनी या निर्देशांची अंमलबजावणी काटेकोरपणे

करण्याचे निर्देश दिले आहे. तसच विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी दक्षता बाळगावी, असंही त्यांनी नमूद केलं आहे.

हवामान/सिग्नल बंद

गोंदिया जिल्ह्यात तापमानाच्या पाऱ्यात दिवसेंदिवस वाढ होत आहे. आज देखील तापमान 43 पूर्णांक 2 दशांश अंशावर गेलं आहे. वाढत्या उन्हाची तीव्रता बघता वाहतूक विभागान दुपारी साडेबारा ते चार वाजेपर्यंत सिग्नल बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे तप्त उन्हात आता नागरिकांना ताटकळत सिग्नलची वाट बघावी लागणार नाही.

G20 उपग्रह

हवामानाचा अभ्यास करून त्यावर देखरेख ठेवण्यासाठी तयार करण्यात आलेला भारताचा G20 उपग्रह पुढल्या वर्षात प्रक्षेपित केला जाईल, अशी शक्यता असल्याचं इस्रो, अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेचे अध्यक्ष व्ही. नारायणन यांनी म्हटलं आहे. ते काल हैदराबाद मध्ये आयोजित कार्यक्रमात संरक्षण संशोधन आणि विकास संस्था, इस्रो, आणि एरोनॉटिकल सोसायटी ऑफ इंडियाच्या शास्त्रज्ञांना संबोधित करत होते. केवळ एकाच रॉकेटचा वापर करून १०० पेक्षा जास्त उपग्रहांचं प्रक्षेपण करणारा भारत हा पहिला देश असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

क्रिकेट

बीसीसीआय अर्थात भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं वरिष्ठ निवड समितीचे अध्यक्ष म्हणून अजित आगरकर यांचा कार्यकाळ एका वर्षानं वाढवला आहे. २०२७ च्या एकदिवसीय क्रिकेट विश्वचषकाच्या तयारीच्या दृष्टीनं हा निर्णय घेतला असल्याचं नियामक मंडळानं म्हटलं आहे. जुलै २०२३ मध्ये आगरकर यांची वरिष्ठ निवड समितीचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली होती.

आयपीएल

आज संध्याकाळी साडेसात वाजता पंजाब किंग्ज आणि लखनऊ सूपर जाएंट्स यांच्यात सामना होणार आहे. हा सामना चंदीगढच्या महाराजा यादविंद्र सिंग मैदानावर खेळला जाईल.

*****